नि.फौ.प्र.क्र.१६/२०२४
सरकार -वि.- जगन नारखेडे+१३
**निशाणी क्र. ३६८**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक १९ याची जबानी</u>**

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

नांव - विजय मोहन कापसे,

वय - ३६ वर्षे, व्यवसाय – शेती,

रा. - तरोडा, ता. मुक्ताईनगर, जि.जळगाव.

**<u>सरतपास- सरकारी अभियोक्ता श्री.आर.बी. देवराज यांचेमार्फत शपथेवर सुरु....</u>**

०१. माझी शेती गट क्र.१३१ मध्ये तरोडा येथे असून ती २ हेक्टर ५७ आर आहे. सन २०२२-२३ मध्ये मी माझ्या शेतात कापूस पेरला होता. तो कापूस ३२ क्वींटल झाला होता. ज्यावेळी विनायक गारमोडे कापूस घेण्याकरिता माझ्याकडे आले होते त्यावेळी त्यांनी जगन्नाथ नारखेडे व मिलींद पाटील यांचा फोनवर माझा संपर्क करुन दिला होता. तो संपर्क कापसाच्या भावाच्या संदर्भात करुन दिला होता. त्यावेळी ९ हजार रुपयांच्या भावाने कापूस घेण्याचे ठरले होते. विनायक गारमोडे हा मापारी असून तो व इतर माणसांनी कापूस मोजला. तो आयशर गाडी घेवून आला होता. तो कापूस जिनमध्ये मोजला. ती जिन मोताळा फाट्याजवळ आहे. साक्षीदार परत स्वतःहून सांगतो की, ती जिन दाताळा फाट्याजवळ आहे. त्या पावतीचा फोटो मी माझ्या मोबाईमध्ये काढला असून मुळ पावती विनायक गारमोडे जवळ आहे. गारमोडेंनी मला २० दिवसानंतर १ लाख ४० हजार नगदी दिले होते व उर्वरित रक्कम १ लाख ४७ हजाराचा धनादेश दिला होता. तो धनादेश मी वटवण्याकरिता बँकेत टाकला असता तो वटला नाही. शेतकारी लोकांची मिटींग झाली होती त्यावरून मी मलकापुर पोलीस स्टेशनला तक्रार दिली होती. मी पोलीसांना तपासाकामी उतारा व पावती दिले होते. तसेच मी पोलीसांना चेकची पावती देखील दिली होती. मी विनायक गारमोडे याला ओळखतो. तो आज न्यायालयात हजर नाही. मी आजरोजी अभिलेखावर दि.१५.०८.२०२३ रोजीचा अस्सल धनादेश व दि.०५.०८.२०२३ रोजीचा रिर्टन मेमो दाखल केला असून त्यास **<u>निशाणी क्र.३६९ व ३७०</u>** देण्यात येतो.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१,४,११ व १२ तर्फे विधीज्ञ श्री.एन.सी.जाधव यांचेमार्फत सुरु....</u>**

०२.	मी पोलीसांना जबाब देतेवेळी ज्यावेळी विनायक गारमोडे कापूस घेण्याकरिता माझ्याकडे आले होते त्यावेळी त्यांनी जगन्नाथ नारखेडे व मिलींद पाटील यांचा फोनवर माझा संपर्क करुन दिला होता, तो संपर्क कापसाच्या भावाच्या संदर्भात करुन दिला होता असे सांगितले होते. सदर बाब माझ्या बयाणात का नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. माझे गाव मुक्ताईनगर पोलीस स्टेशन अंतर्गत येते. मी मुक्ताईनगर पोलीस स्टेशनला सदर व्यवहाराबाबत फिर्याद वगैरे दिलेली नाही. धनादेश अनादराबाबत मी कोणतीही केस दाखल केली नाही. मिलींद अरविंद पाटील यांच्याशी माझा कापसाचा सौदा झाल्याचे मी पोलीसांना बयाण देतेवेळी सांगितले ते खरे आहे. मला दिलेला चेक हा मिलींद अरविंद पाटील याच्याच खात्यावरचा असून सदर बाब पोलीसांना सांगितलेली खरी आहे. मिलींद पाटील यांनी मला फोनवरून सांगितले होते की, प्रति क्वींटल १ हजार रुपये प्रमाणे कापूस मोजतेवेळी दिले आणि बाकी पैशांपैकी अर्धे २० दिवसानंतर व ४० दिवसानंतर उर्वरित पैसे मिळतील असे बयाण देतेवेळी जे सांगितले होते ते खरे आहे. माल ताब्यात घेणारे आणि मालाची रक्कम देण्याबाबत आश्वासित करणारे मिलींद पाटील हेच होते असे जे मी पोलीसांना बयाण देतेवेळी सांगितले ते खरे आहे.

०३.	मी उर्वरित पैसे मिळण्याबाबत या प्रकरणातील कोणत्याही आरोपींना नोटीस दिली नाही. रक्कम वसूल करण्याकरिता मी दिवाणी दावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना कोणताही माल दिलेला नसल्यामुळे मी कोणत्याही आरोपींविरुध्द कायदेशीर कारवाई केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीसांकडे खोटे बयाण नोंदवले व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास काही नाही.

<u>**उलटतपास- आरोपी क्र.२ व ३ तर्फे विधीज्ञ श्री.तांदुळकर यांचेमार्फत सुरु....**</u>

०४.	मी पोलीसांना बयाण देतेवेळी उर्वरित पैसे १ लाख ४७ हजाराचा धनादेश दिल्याचे सांगितले होते. सदर बाब माझ्या जबाबात का नमूद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. मी पोलीसांना तपासाकामी १ लाख ४७ हजारांचा धनादेश दिला होता. मी त्या धनादेशाची प्रत दाखल केलेली नाही. मी पोलीस स्टेशन मलकापुर येथे कोणत्या तारखेला तक्रार दिली हे मला आठवत नाही. ती तक्रार मी दोन वर्षांपूर्वी सातव्या महिन्यात दिली होती. ती तक्रार मी विनायक गारमोडे, जगन नारखेडे व मिलींद पाटील यांच्या विरोधात दिली होती.

त्या तक्रारीत माझे बयाण नोंदविले नव्हते. माझ्या तक्रारीवरून कारवाई न झाल्यामुळे मी आरोपींविरुध्द कोणतीही खाजगी तक्रार दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी नमुद केल्याप्रमाणे कोणताही व्यवहार झालेला नसल्यामुळे मी आरोपीविरुध्द कोणतीही कारवाई केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासातील मजकुर खोटा सांगत आहे व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास काही नाही.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.५ तर्फे विधीज्ञ श्रीमती एन.के.डोसे यांचेमार्फत सुरु....</u>**

०५. आरोपी क्र.१, ४, ११, १२, २ व ३ तर्फे घेण्यात आलेला उलटतपास स्वीकारण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.६,७, ९ व १४ तर्फे विधीज्ञ श्री.जी.डी.पाटील यांचे मार्फत सुरु....</u>**

०६. मी पोलीसांना बयाण देतेवेळी विनायक गारमोडे हा मापारी असल्याचे सांगितले होते. तसेच मी पोलीसांना बयाण देतेवेळी माल मोजल्यानंतर त्या पावतीचा फोटो मी मोबाईलमध्ये काढून घेतला होता व मुळ त्यांनी ठेवली होती असे सांगितले होते. मी पोलीसांना बयाण देतेवेळी विनायक गारमोडे याने २० दिवसानंतर मला १ लाख ४० हजार रुपये नगदी आणून दिले होते असे सांगितले होते. सदर बाबी माझ्या बयाणात का नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत संपूर्ण सौदा हा संजय वर्गे यांच्यामार्फत झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझी मिलींद पाटील विनायक गारमोडे यांच्याशी ओळख संजय वर्गे यांच्या मार्फत झाली असून मी प्रत्यक्षात त्यांना ओळखत नाही. हे म्हणणे खरे आहे की, संजय वर्गे हा माझा नातेवाईक आहे.

०७. मी पोलीसांना माझ्याकडे शेती असल्याबाबत व त्यावेळी मी कापूस पेरला होता याबाबत पोलीसांना कागदोपत्री पुरावा तपासाकामी दिला होता. पोलीसांनी तो उतारा व कागदोपत्री पुरावा का दाखल केला नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. त्यावेळी मी ३२ क्वींटल कापूस उत्पन्न घेतल्याबाबत माझ्याकडे कोणताही कागदोपत्री पुरावा उपलब्ध नाही.

प्रश्न- माल दिल्याबाबत तुमच्याजवळ कागदोपत्री पुरावा आहे काय?

उत्तर - पावती आहे.

०८. मी पोलीसांना १ लाख ४७ हजाराचा दिलेला धनादेश पोलीसांनी का दाखल

केला नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. मी आजपर्यंत मिलींद अरविंद पाटील याच्याविरुध्द कोणतीही कारवाई केली नाही. पोलीसांनी मिलींद पाटील, विनायक गारमोडे व जगन नारखेडे यांच्याविरोधात कोणतीही कारवाई पोलीसांनी न केल्यामुळे मी वरिष्ठांना तक्रार दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या शेतात ३२ क्वींटल कापूस पेरला नाही व तो कापूस मी आरोपीला दिलेला देखील नाही. हे म्हणणे खरे नाही की, संजय वर्गे व पोलीसांशी संगनमत करुन मी खोटे दस्ताऐवज मिळवले व ते दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, त्याचा गैरफायदा घेवून आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास काही नाही.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.८ तर्फे विधीज्ञ श्री.एन.एस.तायडे यांचेमार्फत सुरु....</u>**

०९. आरोपी क्र.१, ४, ११, १२, २, ३, ६, ७, ९ व १४ तर्फे घेण्यात आलेला उलटतपास स्वीकारण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१० तर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.मोरे यांचेमार्फत सुरु....</u>**

१०. आरोपी क्र.१, ४, ११, १२, २, ३, ६, ७, ९ व १४ तर्फे घेण्यात आलेला उलटतपास स्वीकारण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१३ तर्फे विधीज्ञ श्री.बी.एस.वानखेडे यांचेमार्फत सुरु....</u>**

११. आरोपी क्र.१, ४, ११, १२, २, ३, ६, ७, ९ व १४ तर्फे घेण्यात आलेला उलटतपास स्वीकारण्यात आला.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by PARAG SATISH THAKARE
Date: 2026.01.28 17:45:25 +0530

दिनांक : २८/०१/२०२६.

**( पी.एस.ठाकरे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.१), मलकापूर